" रायगड जिल्ह्याच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान व महत्वः एक अभ्यास ".

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

वाणिज्य विषयातील पीएच.डी पदवी नोंदणी साठी सादर केलाला प्रस्ताव

अभ्यासक :

सहा.प्रा . सुरेश सुदाम दुंडे

एम .कॉम (सेट)

वसंतराव नाईक कला ,वाणिज्य व बॅरिस्टर ए.आर .अंतुले विज्ञान महाविद्यालय

म्हसळा.ता .म्हसळा जि .रायगड .402105

मार्गदर्शक :

डॉ. आर.व्ही.घाडगे

एम .कॉम.बी.एड. पीएच.डी

शिवाजी कॉलेज रेणापूर ता रेणापूर ,जि लातूर –413527

अनुक्रमणिका

अनु . क्र	प्रकरण	पृष्ट क्रमांक
1	प्रस्थावना	03
2	अभ्यास क्षेत्राची निवड	04
3	विषयाचे महत्व	04
4	गृहिते	04
6	संशोधन पद्धती	05
7	अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा	06
8	प्रकरणाची विभागणी	06
9	निष्कर्ष आणि उपाय योजना	07
10	संदर्भ ग्रंथ सूची	07

प्रस्तावनाः

मानव हा भ्रमणशील प्राणी आहे .अगदी प्राचीन काळापासून मानव प्रवास करीत आला आहे या प्रवासाच्या आवडी मुळे कोलंबसने अमेरिकाचा शोध लावला पूर्वी प्रवासाची साधने म्हणून घोड्याचा वापर केला जायचा ,आज प्रवासाचे स्वरूप बदललेले आहे त्यामुळे पर्यटन क्षेत्राला महत्व प्राप्त झाले आहे .मानवाने विविध ठिकाणी केलेला हेतुपूर्वक प्रवास व वास्तव्य याला पर्यटन सर्वसाधारणपणे म्हणतो .पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील अल्पकालीन केलेले स्थलांतर होय .हे स्थलांतर संशोधन ,मनोरंजन ,व्यवसाय ऐशआराम या साठी केलेले असते . मानवच्या प्रवासाची सुरवात जरी अनेक अर्थाने झालेली असली तरी आधुनिक काळात त्याला व्यवसायाचे स्वरूपप्राप्त झाले आहे पर्यटन व्यवसाय हा सर्वात जलद गतीने विकसित होत आहे या मध्ये कमी भांडवल गुंतवणूकीतून रोजगार निर्मिती होते .त्यामुळे विकसित व अविकसित देश यांचा सहभाग दिवसेदिवस वाढत आहे .पर्यटन हा ऐतिहासिक सामाजिक ,सांस्कृतिक ,भौगोलिक, नैसर्गिक घटकांच्या आधारावर चालतो या बाबीमध्ये जितकी जास्त विविधता तेवढा जास्त पर्यटन व्यवसायाचा विकास होतो .गेल्या काही वर्ष्यात पर्यटन उद्योगामध्ये सातत्यपूर्ण वाढ दिसून आली आहे आणि सर्व देशाच्या सामाजिक दृआर्थिक प्रगतीमध्ये हा उद्योग म्हणजे एक महत्वपूर्ण आणि अविभाज्य भाग झाला आहे ..पर्यटन क्षेत्र हे आंतरराष्ट्रीय वाणिज्य क्षेत्रामधील मुख्य क्षेत्रापैकी एक आहे आणि त्याचवेळी ते बऱ्याच विकसनशील देशा मधील मुख्य आर्थिक स्त्रोता पैकी एक आहे. 2019 मध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या आगमनात भारताचा वाटा 1.24 : होता .वर्ष 2019 मध्ये एकूण 17.91(उपससपवदे) परदेशी पर्यटक भारतात आले. भारत हा पर्यटनासाठी सर्वात अनुकूल संसाधने असलेला व सर्वात वेगाने उदयास येणारा पर्यटक देश आहे.जागतिक पर्यटन उद्योग वाढवण्याची भारताला सुवर्णसंधी आहे.

महाराष्ट्र पर्यटन :

महाराष्ट्र हे देशांतर्गत एखाद्या देशा सारखे राज्य असून हे राज्य लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या दोन्ही बाबतीत देशातले तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे . राज्याची राजधानी मुंबई असून तो जगाच्या सर्वात मोठ्या आणि उद्योगाच्या उलाढाली असलेल्या शहरा पैकी एक आहे .तसेच ती देशाची आर्थिक आणि करमणूक क्षेत्रातली राजधानी आहे .महाराष्ट्र हे पर्यटकासाठी विविध प्रकारची पर्यटनस्थळे असणारे जगातल्या मोजक्या प्रदेशापैकी एक आहे या राज्याला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा हिरव्यागार कोंकण किनारपट्टीसह लाभला आहे .पश्चीम घाट आणि सह्याद्रीच्या पर्वत रांगा मध्ये थंड हवेचे ठिकाण आहेत तसेच अर्धसदाहरित आणि पानगळ अरण्ये तसेच जलाशये आहेत .घनदाट वनसंपदा लाभलेला महाराष्ट्रातला विदर्भ घनदाट वनासह अनेक वन्य जीवाचे अभयारण्य व निसर्ग उद्यान आहे .महाराष्ट्राला समृद्ध इतीहास ,परंपरा आणि संस्कृतीचे वरदान लाभलेला आहे .येथील जागतिक दर्ज्याचे प्राचीन किल्ले आणि स्मारके ,प्राचीन गुंफा मंदिरे आणि यात्रा स्थळे याला पुष्टी देतात .भारतातील विदेशी पर्यटकाचे आगमन 1.24 : आहे आणि देशांतर्गत पर्यटकांच्या भेटी बाबतीत महाराष्ट्र राज्याची पसंती आहे .

रायगड पर्यटन :

रायगड हा महाराष्ट्र राज्यातील कोकण विभागातील एक जिल्हा आहे त्याच्या पश्चिमेस अरबी समुद्राची किनारपट्टी लाभली आहे. जिल्ह्यातील डोंगराळ भाग हा मुख्यत्वेकरून सह्याद्री पर्वतरांगांमध्ये येतो. रायगड जिल्ह्यामध्ये पुरातन ऐतिहासिक स्थळे, आकर्षक समुद्रकिनारे, निसर्गरम्य पश्चिम घाटातील अप्रतिम ठिकाणे पहावयास मिळतात. महड आणि पाली स्थित अष्टविनायक मंदिरे तसेच घारापुरी बेटावरील एलेफंटा गुहा या रायगड जिल्ह्याच्या वैभवशाली व सांस्कृतिक इतिहासाच्या साक्षी देतात. विविध सांस्कृतिक परंपरा, धर्म, भाषा असणाऱ्या लोकांनी रायगड जिल्ह्याची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये विविध राजवटीतील भव्य आणि चिरेबंदी किल्ले आहेत ,जसे रायगड किल्ला, कुलाबा किल्ला, मुरुड–जंजिरा किल्ला, सुधागड किल्ला इ. आजही पाहणाऱ्याला आश्चर्यचकित करतात. रायगड जिल्हयात एकुण 14 तालुके आहेत . पर्यटनासाठी रायगड जिल्हा म्हणून लोकांची पसंती आहे

अभ्यास क्षेत्राची निवड :

रायगड जिल्हा हा नैसर्गिक सौंदर्य, समुद्रकिनारे, धार्मिक, ऐतिहासिक,पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. गोवा आणि केरळ राज्याची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. ही दोन्ही राज्ये खूप छोटी आहेत पण पर्यटनाच्या दृष्टीने योजना आणि विपणन नियोजन यामुळे ते प्रगत आहेत. रायगड जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्रामध्ये प्रचंड क्षमता आहे.रायगड मधील लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी आणि या क्षेत्रात गुंतलेल्या मनुष्यबळाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी पर्यटन उद्योग महत्त्वाचा आहे त्याकरिता पर्यटन विस्तारासाठी ठोस धोरण आखणे महत्त्वाचे आहे. रायगड जिल्ह्याच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान व महत्व याचा विचार करत असताना पर्यटनाच्या योगदानातून आर्थिक विकास कसा झाला व रायगड जिल्ह्यातील पर्यटनाचे महत्व हे पाहणे गरजेचे आहे प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास हा ऐतिहासिक स्थळे ,धार्मिक ,सांस्कृतिक ,स्थळे ,आणि नैसर्गिक स्थळांचा विचार करून अभ्यास क्षेत्राची निवड केली जाईल .

अभ्यासाचे महत्व–

रायगड जिल्हयाला ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी लाभलेली आहे दरवर्षी राज्यासह देश–विदेशातील पर्यटकांना रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचे आकर्षण वाढले आहे यामुळे जिल्ह्यात सुट्टीच्या हंगामात लाखो पर्यटक हजेरी लावतात . राज्यातील इतर भागांच्या तुलनेत दर वर्षी जिल्ह्यात येर्णाया पर्यटकांची संख्या लक्षात घेतली तर ती अधिक आहे .रायगड जिल्ह्यात पर्यटन स्थळे जी आहे त्यात दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे हरिहरेश्वर ,दिवेआगर ,जंजिरा किल्ला ,रायगड किल्ला,महड ,माथेरान ,शिवथर घळ,श्री कनकेश्वर ,महाडचे चवदार तळे,कर्नाळा अभयारण्य हि एकंदरीत सर्व स्थळे आहेत त्यामुळे पर्यटन विकासा बरोबर रोजगाराच्या संधी आणि आर्थिक झाला आहे . रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळाची,व उत्पादनाची ओळख करून देणे आवश्यक आहे . पर्यटनामध्ये जलद गतीने वाढ होत आहे त्या बरोबरच रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकास होत आहे म्हणून या विषयाचे महत्व आहे .

अभ्यासाची उद्दिष्टे–

अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत

१) रायगड जिल्ह्याच्या पर्यटन बाबतच्या समस्या व विकासाचा अभ्यास करणे

२) रायगड जिल्ह्यातील पर्यटनाचे महत्व अभ्यासने

3) रायगड जिल्ह्यतील पर्यटनातून आर्थिक विकासाचा अभ्यास करणे

४) पर्यटन क्षेत्रातील लघु व कुटीर उद्‌योगांची आर्थिक स्थितीचा आढावा घेणे

५.) पर्यटन दुर्लक्षित क्षेत्रांचा अभ्यास करणे

अभ्यासाचे गृहितक–

अभ्यासाची गृहितके खालीलप्रमाणे आहेत.

१.रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा योग्य तेवढा विकास झालेला नाही त्यामुळे जिल्ह्यातील लोकांचा आर्थिक विकास झाला नाही .

२. पर्यटनाविषयी जागरूकता नसल्यामुळे निवड क्षेत्रातील पर्यटन स्थळाचा विकास मंद आहे

3 . रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना खूप महत्व आहे .

४.पर्यटकाना पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी पायाभूत सुविधा अपुऱ्या आहेत.

साहित्याचा आढावा :

१.संयुक्त राष्ट्र संमेलन (१९३७) या मध्ये तज्ञाने पर्यटनाची शास्त्रशुद्ध व्याख्या करण्यात आली संयुक्त राष्ट्र संमेलनात जागतिक पर्यटन संघटनेची स्थापना करण्यात आली .त्यानंतर पर्यटनावर संशोधन करण्यात आले

२.मायकेल पीटर(१९६९) यानी म्बवदवउपब प्उचंबज व ज्वनतपेउ या पुस्तकात देशी विदेशी पर्यटकाकडून मिळणाऱ्या उत्पनावर प्रकाश टाकला आहे

३ .कोपर सी . (१९९९) पर्यटन तत्व आणि पद्धती या मध्ये पर्यटनाचा आर्थिक ,सामाजिक आणि पर्यावरण याचा परिणाम या वर भर दिला आहे

४ .जे .के शर्मा (२०००)यांचे ग्रंथ पर्यावरण नियोजन आणि विकास या मध्ये त्याने पर्यावरण नियोजन आणि विकास यांचा पाया आणि भविष्यात पर्यटन उद्योगाचे नियोजन सांगितले

५.विपिन ली हैनन (२००४) याने सामाजिक पर्यटन एक अभ्यास या विषयावर विचार मांडले त्याने चीन मधील सामाजिक पर्यटन सांगितले

६ .राणा प्रताप (२००५) त्याने पर्यटन प्रादेशिक विकासास कारणीभूत घटक बिहार राज्याच्या अभ्यासावरून सांगितले की सर्वांगीण विकासासाठी पर्यटन आवश्यक आहे .

७ .आशिष अंकुश नाईक (२०१३)`वबपंस`चमबज व जिवनतपेउ कमअमसवचउमदज पद पदकपं या मध्ये यांनी जागतिकीकरणात भारतासाठी पर्यटन उद्योगाचे आर्थिक महत्व सांगितले.

संशोधन आराखडा

रायगड जिल्ह्यात ७२ हून अधिक महत्त्वाची पर्यटन स्थळे आहेत त्या पैकी अभ्यासासाठी 10 पर्यटन स्थळे नमुना म्हणून निवडण्यात आले आहे

अंक .क्र	जिल्हा	पर्यटन स्थळे
1	रायगड	हरिहरेश्वर
2		दिवेआगर
3		जंजिरा किल्ला
4		चवदार तळे
5		पाली (सुधागड)
6		महड
7		कर्नाळा
8		मुरुड
9		श्रीवर्धन
10		अलिबाग

संशोधन पद्धती–

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे .रायगड जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांना प्रतक्ष भेटी देउन व पर्यटकांना भेटून प्रश्नावलीच्या सहायाने प्राथमिक माहिती प्राप्त केली जाईल तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांची वैयक्तिक मुलाखत घेतली जाईल. तर दुय्यम स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी विषयाशी संबधित विविध संदर्भ ग्रंथ,साप्ताहिके ,मासिके ,वर्तमान पत्रे ,सरकारी नोंदी आणि अहवाल ,विविध कार्यालयाचे अहवाल ,इंटरनेट.यांचा उपयोग केला जाणार आहे .

माहितीचे विश्लेषण–

- संकलित केलेली माहिती विश्लेषणाच्या उद्देशासाठी योग्यरित्या सारणीबद्ध केला जाईल.
- माहिती चे विश्लेषण आणि अर्थ लावण्यासाठी chi –Square सहसंबंध विश्लेषण आणि ॅ सारखी योग्य सांख्यिकीय साधने वापरली जातील.

अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा–

पर्यटन हे केवळ आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे नसून सर्वांगाने महत्वाचे आहे. पर्यटनाशिवाय कोणतेही क्षेत्र फार काळ सेवा देऊ शकत नाही. प्रस्तुत अभ्यासासाठी संशोधकाने रायगड जिल्ह्याची निवड केली

आहे. अभ्यासासाठी रायगड जिल्ह्याच्या विविध तालुक्यांतील पर्यटकांची निवड करण्यात येणार आहे. संशोधकाला त्याच्या अभ्यासासाठी खालील मर्यादा आहेत.

1) प्रस्तुत अभ्यास हा फक्त रायगड जिल्ह्या पुरता मर्यादित आहे .

2) प्रस्तुत अभ्यासा साठी 2011 ते 2021 दहा वर्षाचा कालावधी घेतला आहे

3) प्रस्तुत अभ्यास हा प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारित आहे

प्रकरण योजना–

प्रस्तुत अभ्यास पाच प्रकरणांमध्ये विभागला गेला आहे.

1 .प्रकरण पहिले :प्रस्तावनाः या प्रकरणात पर्यटनाचा परीचय अर्थ ,व्याख्या,स्वरूप व्याप्ती उद्दीष्ट्ये,,गृहिते ,संशोधन पद्धती याचा आढावा घेतला जाईल .

2.प्रकरण दुसरे अभ्यास क्षेत्राची पार्श्वभूमीः

या प्रकरणात रायगड जिल्ह्याची सविस्तर माहिती दिलेली असून त्यात हवामान ,तापमान ,लोकसंख्या ,प्रजन्य वृष्टी ,शेती ,व्यवसाय ,भाषा ,वाहतूक साधने , रायगड जिल्ह्यातील पर्यटन , जिल्ह्यातील पर्यटनाचे महत्व आढावा या प्रकरणात घेतला आहे .

3. प्रकरण तिसरे : या प्रकरणात. अभ्यासा साठी निवडलेल्या उद्दीष्ट्ये सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे

4. प्रकरण चौथे : रायगड जिल्ह्याच्या पर्यटन स्थळातील सुविधाचा अभाव व दुर्लक्षित पर्यटन स्थळे

रायगड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा जिल्हा आहे राज्यासह देश–विदेशातील पर्यटकांना रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचे आकर्षण आहे . वाढत्या पर्यटनाच्या प्रमाणात रस्ते, वीज, पाणी, पार्किंग, सार्वजनिक स्वच्छतागृह या सुविधा विकसित झालेल्या नाहीत तसेच दुर्लक्षित पर्यटन स्थळाचा आढावा घेण्यात येणार आहे .

5. प्रकरण पाचवे :रायगड जिल्ह्याचा आर्थिक विकास व पर्यटनाचे योगदानात्मक महत्व

रायगड जिल्हयाला ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी लाभलेली आहे त्यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्याला रोजगाराच्या संधी प्राप्त होण्या करिता पर्यटनाचा विकास होणे आवश्यक आहे. आर्थिक विकासात पर्यटनाचे योगदान आणि महत्व याचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे .

6.निष्कर्ष आणि उपाय योजना :

या प्रकरणात अभ्यासाचा सारांश आणि निष्कर्ष सादर करण्यात येणार आहे . रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास व त्या ठिकाणी असलेल्या समस्याचा आढावा घेण्यात येणार आहे तसेच ज्या समस्या आहेत त्या दूर करण्यासाठी उपाय योजना मांडण्यात येणार आहे जेणे करून सरकार व स्थानिक शासनास सुधारणा करण्यास मदत होऊन पर्यटना साठी आदर्श जिल्हा होईल .

संदर्भग्रंथ सूची :

1. संयुक्त राष्ट्र संमेलन दृ(१९३७)

२ .कोपर सी . (१९९९) पर्यटन तत्व आणि पद्धती

3 जे .के शर्मा (२०००) यांचे ग्रंथ पर्यावरण नियोजन आणि विकास

४ . Economic Impact Of Tourism –मायकेल पिटर(१९९७)

५ . विपिन ली हैनन (२००४) – सामाजिक पर्यटन एक अभ्यास

६ .महाराष्ट्र पर्यटन धोरण (२०१६)

७.सामाजिक संशोधन पद्धती खैरनार दिलीप

८ .पर्यटन भूगोल घारपुरे विठ्ठल

९.समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती घाटोळे.रा.ना.(१९९५)

१०.भारतातील प्रवास आणि पर्यटन डॉ अनिल कठारे

११.पर्यटन मंत्रालय –अहवाल

१२. www.incredibleindia.org

१३. www.maharashtratourism.gov

१४. www.MTDC.com

संशोधक विद्यार्थी

श्री .सुरेश सुदाम दुंडे

संशोधन मार्गदर्शन

डॉ.   आर.व्ही.घाडगे

एम .कॉम.बी.एड. पीएच.डी